ePaper
“मला अजितदादांची भूमिका फार आवडली, एकदम रोखठोक...”: चित्रा वाघ



वर्ष - 6 । अंक - 265 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- सीबीएसई शाळांच्या बनावट ना हरकत प्रमाणपत्रांचा घोटाळा उघड
- महापालिका प्रवेशद्वारी ‘लक्ष्मीदर्शन’
- मंत्रिपदासाठी इच्छुक नाही, पण मंत्रिमंडळ विस्ताराला वेळ लागणं चांगलं नाही


www.mahaenews.com | रविवार, दि. 8 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# टोलधाड नकोच!

## » सर्वपक्षीय विरोध : टोल वसुली थांबवा, अन्यथा आंदोलन




**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे-नाशिक महामार्गावरील मोशी येथे असलेला टोलनाका काही महिन्यांपूर्वी बंद केला होता. मात्र, पुन्हा हा टोल सुरू केला असून, सामान्य वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून वसुली सुरू केली आहे. याचा निषेध करीत संबंधित टोल वसुली तात्काळ बंद करावी, अन्यथा स्थानिक नागरिकांसह सर्वपक्षीय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.**

मोशीतील इंद्रायणी नदी पुलाजवळ असलेला मोशी पथकर वसुली टोलनाका काही महिन्यांपूर्वी मुदत संपल्याने बंद केला होता. मात्र, सदर टोलनाका पुन्हा सुरू करुन वाहनचालकांकडून वसुली सुरू केली आहे. मोशी आणि चांडोली टोलनाका येथे सुधारित पथकर लागू करण्याबाबत प्राधिकरणाने 5 जानेवारी रोजी सूचना जारी करण्यात आली आहे.

वास्तविक, पुणे-नाशिक महामार्गावर वाहतूक कोंडीने वाहन चालक त्रस्त आहेत. यामध्ये आता नागरिकांना आर्थिक भुर्दंडदेखील सोसावा लागणार आहे. त्यामुळे वाहन चालकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. टोलनाक्यांवरील रांगांमुळे मोशीतून अवघ्या सहा सात किलोमीटर असलेल्या चाकणला किंवा चार किलोमीटरवर असलेल्या भोसरी, नाशिक फाट्याला जाण्यासाठी अर्धा ते पाऊण तासाचा वेळ लागतो. रस्त्याचे रुंदीकरण न झाल्यामुळे अनेक वर्षे वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. टोल नाका बंद झाल्याने मध्यंतरी काही काळ वाहतूक सुरळीत झाली होती. मात्र, आता पुन्हा टोल वसुली सुरू झाल्याने नागरिकांना वाहतूक कोंडी आणि आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे हा टोल कायमचा बंद करावा, अशी मागणी वाहन चालकांनी केली आहे.



“ टोलनाक्यामुळे अनेक गावांना त्याचा फटका बसणार असून नागरिकांवर आर्थिक बोजा पडणार आहे. एकीकडे याठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी होत असून याचे नियोजन करण्यात येत नाही. रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे आहेत. यावर उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे.रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रश्न धुळखात पडला आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने टोलनाका बंद करावा आणि स्थानिक नागरिकांची होणारी लूट थांबावी, अशी आग्रही मागणी आहे. अन्यथा स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांना सोबत घेवून प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. तसेच, सर्वसामान्य वाहनधारकांच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका घ्यावी.

**- संजीवन सांगळे,**
अध्यक्ष, चिखली-मोशी- पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.



“ पुणे-नाशिक महामार्गावर मोशी येथे पथकर वसुली टोलनाका पुन्हा सुरू करण्यात आला असून, स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून टोल वसुली केली जात आहे. मात्र, यामुळे वाहनचालकांना नाहक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. स्थानिक नागरिकांच्या वाहनांना २० किलोमीटर प्रवासाचा सवलतीचा ३१५ रुपये किमतीचा मासिक पास घ्यावा लागणार आहे. याबाबत जाहीर प्रकटन प्राधिकरणाने प्रसिद्ध केले आहे. पुढील एक वर्षासाठी हे दर असणार आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासनाप्रति संताप आहे. त्यामुळे टोलवसुली तात्काळ बंद करण्याचा निर्णय घ्यावा आणि सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

**- दीपक मोढवे-पाटील,** शहराध्यक्ष, भाजपा, वाहतूक आघाडी, पिंपरी-चिंचवड.

## शॉर्ट न्यूज

### थंडी वाढणार



**पुणे :** हिवाळा म्हटले की छान गुलाबी थंडी, नव्याने केले जाणारे व्यायामाचे संकल्प आणि ताजा रसरशीत भाजीपाला, फळफळावळ हे चित्र जेवढे खरे तेवढेच वेगवेगळ्या आजारांनी काहीसे एकाच ठिकाणी जायबंदी होणेही खरेच. त्यामुळेच थंडी वाढण्याच्या हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर प्रकृती सांभाळण्याचे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात येत आहे.

तापमानाचा पारा घसरताच हवामानातील बदलांमुळे होणारे नेहमीचे विषाणूजन्य आजार आणि त्याबरोबरीने सांधेदुखी, दमा आणि इतर श्वसनविकार तसेच त्वचेच्या आणि अस्थिरोगांच्या विविध तक्रारी भेडसावण्यास सुरुवात होते. हिवाळ्यातील हे नियमित आजार टाळायचे असतील, तर पुरेशी विश्रांती, चौरस आहार, समतोल व्यायाम अशी जीवनशैली राखावी आणि कोणत्याही प्रकारच्या दुखण्याकडे दुर्लक्ष न करता लवकरात लवकर डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार घ्यावे, असेही डॉक्टरांकडून स्पष्ट करण्यात येत आहे.

# सीबीएसई शाळांचा घोटाळा उघड!

## » घोटाळ्याचे लोण राज्यभर पसरल्याची शक्यता

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शिक्षक पात्रता परीक्षेतील (टीईटी) गैरप्रकारानंतर आता केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळांची ना हरकत प्रमाणपत्रे बनावट असल्याचा प्रकार समोर आला आहे. पुण्यातील अनेक शाळांची ना हरकत प्रमाणपत्रे बनावट असल्याचे उघड झाले असून, लाखो रुपये घेऊन बनावट कागदपत्रे देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. शाळांच्या बनावट ना हरकत प्रमाणपत्रांचे लोण राज्यभरात असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**



## ना हरकत प्रमाणपत्रे बनावट

राज्यात राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळांची संलग्नता मिळवण्यासाठी संस्थाचालकांना राज्य शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. मात्र पुण्यातील काही शाळांना असे प्रमाणपत्र दिलेले नसतानाही काही शाळा सुरू झाल्याचा प्रकार शालेय शिक्षण विभागाच्या निदर्शनास आला. त्या अनुषंगाने संबंधित तीन शाळांच्या चौकशी करण्याचे, अज्ञात व्यक्तीविरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने राज्यातील विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिला होता. त्यानुसार पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक औदुंबर उकिरडे यांनी पुणे जिल्हा परिषदेला चौकशी करण्याचे निर्देश दिले.

या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी के. डी. भुजबळ यांनी चौकशी केल्यावर अनेक शाळांची ना हरकत प्रमाणपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आले. बनावट ना हरकत प्रमाणपत्रांसाठी मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या नावांचा आणि बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करण्यात आला आहे. तसेच या बनावट ना हरकत प्रमाणपत्रांसाठी लाखो रुपयांची उलाढाल झाल्याचेही व्हॉट्सअॅप चॅटच्या माध्यमातून उघडकीस आले आहे. तसेच मुंबईतील काही शाळांची ना हरकत प्रमाणपत्रेही बनावट असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणाच्या चौकशीचा सविस्तर अहवाल सादर करण्यात येणार आहे. तसेच या प्रकरणाचे लोण राज्यभरात असण्याची शक्यता आहे.

---

# कुंभेवाडी ते आंबे रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी

## » आंबेगाव व जुन्नरमधील आदिवासी भागातील नागरिकांची होऊ शकते सोय

**। फुलवडे, । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागाला जोडणाऱ्या कुंभेवाडी ते आंबे या साडेतीन किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण झाल्यास या भागातील नागरिकांना सोयीचे होणार असून, यामुळे रोजगाराचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते बुधाजी डामसे यांनी दिली.

यातील आंबेगाव तालुक्यातील दोन किलोमीटर व जुन्नर तालुक्यातील दीड किलोमीटर रस्ता कच्च्या असून, या रस्त्याचे डांबरीकरण व्हावे, यासाठी असाणे व आंबे ग्रामपंचायतीने संबंधित पंचायत समित्यांकडे प्रस्ताव सादर केला असल्याचे असाणेचे सरपंच खेमा गभाले व आंबेचे सरपंच मंगल चिमटे यांनी सांगितले.

आंबेगाव तालुक्यात दरवर्षी साधारणपणे ५०० टन हिरडा तयार होतो. पेसा कायद्यांतर्गत शेतकऱ्यांना या हिरड्याची विक्री करता येत असल्याने विक्रीसाठी त्यांना जुन्नर येथे जाऊन तो विकता येऊ शकतो. तसेच या भागातील पर्यटनामुळे छोट्या-मोठे व्यवसाय निर्माण होऊन रोजगाराचा प्रश्न मार्गी लागू शकतो असेही डामसे यांनी सांगितले.

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून जाणारा हा मार्ग पर्यटनासाठी पर्वणी ठरू शकतो. सध्या या मार्गाने काही पर्यटकही येतात. परंतु, अरुंद घाटरस्ता, घाट रस्त्यांना काही ठिकाणी संरक्षक भिंती अथवा कठडे नसणे तसेच या मार्गातील साडेतीन किलोमीटर अंतराचा आंबे ते कुंभेवाडी हा कच्चा रस्ता यामुळे या मार्गाने पर्यटकांची संख्या कमी आहे. या मार्गावरील रस्त्याचे, घाटरस्त्यांचे रुंदीकरण करून आवश्यक त्या ठिकाणी संरक्षक कठडे तयार केल्यास हा मार्ग सुखकर होऊ शकतो.



### असा असेल मार्ग

» तळेघर, फलोदे, पिंपरी (घाटरस्ता), म्हाळुंगे पाटण, कुशिरे बुद्रुक (घाटरस्ता), कुशिरे खुर्द, भोईरवाडी, आमडे (घाटरस्ता), माळीण फाटा, नवीन माळीण, कुंभेवाडी (घाटरस्ता), आंबे (घाटरस्ता), इंगळून, सोनावळे, बोतार्डे, सोमतवाडी मार्गे जुन्नर येथे पोहोचू शकतो. हे अंतर सुमारे ६५ किलोमीटर आहे.

### पर्यटनाला मिळू शकते चालना

» पर्यटनासाठी या रस्त्यावर ४ घाटरस्ते असून, आंबे व आहुपे येथे कोकणकडा तसेच डिंभे धरणाचे पाणलोट क्षेत्र आहे. तसेच पावसाळ्यात येथील डोंगरदऱ्यांत लहान-मोठे धबधबे असल्याने हा निसर्गरम्य परिसर पर्यटकांना नक्कीच भुरळ घालेल.

# 'संसद आणि न्यायव्यवस्था यांचे एकमेकांच्या क्षमतांवर आक्रमण नको'



**।पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यघटनेतल्या तरतुदींचे न्यायव्यवस्थेकडून पालन केले जाते. संसद आणि न्यायव्यवस्था यांनी एकमेकांच्या क्षमतांवर आक्रमण करू नये. लोकशाही व्यवस्था राबवण्यासाठी सामान्य लोकांचा सहभाग महत्त्वाचा असून, तो वाढवण्यासाठी न्यायव्यवस्थाही प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी यांनी शनिवारी केले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयातर्फे आयोजित डॉ. पतंगराव कदम स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन माहेश्वरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. 'लोकशाही आणि न्याय व्यवस्था' या विषयावर माहेश्वरी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी यांच्या हस्ते झाले.

विद्यापीठाचे कार्यवाह आणि प्र-कुलगुरू डॉ विश्वजित कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, विधी शाखेच्या अधिष्ठाता डॉ. उज्वला बेंडाळे आदी या वेळी उपस्थित होते.

# महापालिका प्रवेशद्वारी ‘लक्ष्मीदर्शन’!

## सुरक्षा विभागाची सावरासारव : अधिकारी वर्तुळात मोठी खळबळ

पिंपरी ।
। महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत शुक्रवारी (दि. ६) रोजी एक नागरिक बॅगेमध्ये भरून १५ लाख रूपयांची रोकड घेऊन आला होता. हा व्यक्ती रोकड घेऊन महापालिकेत प्रवेश करत असतानाच सुरक्षा रक्षकांनी बॅग तपासणीसाठी मशीनमध्ये (स्कॅनर) ठेवण्यास सांगितले. तपासणी दरम्यान बॅगेत मोठ्या प्रमाणात रोकड असल्याचे समोर येताच एकच खळबळ उडाली होती.**




या बॅगेत १५ लाख रूपयांची रोकड असतानाही त्यामध्ये केवळ ३ ते ४ लाख रुपयेच होते, असे सांगत सुरक्षा विभागाने सारवासारव केल्याने संशयात आणखीनच भर पडली आहे. शुक्रवारी (दि. ६) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास एक व्यक्ती महापालिकेत बॅग घेऊन आली होती. पालिकेच्या प्रवेशव्दारावरच सुरक्षा रक्षकाने संबंधित व्यक्तीला तपासणी मशीनमध्ये (स्कॅनर) बॅग ठेवण्यास सांगितले. त्यामुळे ती व्यक्ती काहीशी घाबरली. स्कॅनरमध्ये बॅग ठेवताच त्यामध्ये रोकड असल्याचे निदर्शास आले. सुरक्षा रक्षकांनी तत्काळ वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांना बोलावून घेत बँगेतील पैशांची माहिती दिली. वरिष्ठांनी संबंधित व्यक्तीकडे पैशांची चौकशी करून सोडून दिले. मात्र याबाबत उलट-सुलट चर्चा रंगली.

### सुरक्षा विभाग प्रमुख काय म्हणतात...

**दरम्यान, संबंधित व्यक्तीला सुरक्षा अधिकाऱ्यांनी बोलावून घेत अधिक चौकशी केली. या चौकशीत संबंधित व्यक्ती विभागात काही कामासाठी आली होती. त्याने बँकेतून साडेतीन लाख रूपये काढले होते. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव ते पैसे कारमध्ये न ठेवता बरोबर घेऊन पालिकेत आणले होते. सुरक्षा विभागाने त्वरीत संबंधित व्यक्तीला पैसे परत ठेवून पालिकेत येण्यास सांगितल्याची माहिती सुरक्षा विभाग प्रमुख उदय जरांडे यांनी दिली**

---

# चित्रपटातील भूमिकेने कलाकार समृध्द!

## अभिनेते सयाजी शिंदे : जागतिक मराठी संमेलन

पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

चित्रपटात साकारलेल्या भूमिकेने कलाकार समृध्द होत असतो कधी अस्वस्थ होत नाही असे मत ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांनी व्यक्त केले. १८ व्या जागतिक मराठी संमेलनातील माझा चित्र प्रवास या कार्यक्रमात ते बोलत होते. दिग्दर्शक नागराज मंजुळे, युवा कलाकार आकाश ठोसर, अभिनेते सयाजी शिंदे आणि जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे व्यासपीठावर होते.

सुमारे पावणे दोन तासाच्या गप्पांच्या माध्यमातून या कलाकारांनी उपस्थितांबरोबर संवाद साधला. तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. रामदास फुटाणे यांनी अधून मधून संवादाची पेरणी केली. सयाजी शिंदे म्हणाले, आजवर विविध भाषेतील सुमारे ५०० पेक्षा अधिक चित्रपटात काम केले आहे. प्रेक्षकांना भूमिका आवडली की ते नक्कीच डोक्यावर घेतात. आणि हाच कलाकारांच्या दृष्टीने ड्रीम रोल असतो. ज्येष्ठ अभिनेते स्व निळूभाऊ फुले यांच्या बरोबर काम करता आले त्याबरोबर बरेच काही शिकता आले. याचा नक्कीच आनंद आहे.

तेलगू,तामिळ , मराठी, कन्नड अशा विविध भाषेतील चित्रपटात ५०० पेक्षा अधिक भूमिका साकारता आल्या आहेत याचे समाधान आहे. आणि प्रत्येक भाषेतील पहिल्या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळाला आहे. मंजुळे यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली आहे. काम करीत असताना भाषा ही महत्वाची असते. त्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचता येते असे ते म्हणाले. वाचन संस्कृतीला पर्याय नाही. तसेच प्रत्येक कवितेची भाषा ही कविची स्वतःची असते. हे समजून घेतले पाहिजे. यासाठी हे संमेलन आहे.यावेळी आकाश ठोसर यानेही मनोगत व्यक्त केले.



**“ चित्रपट क्षेत्रात येईन असं वाटले नव्हते. तसे स्वप्न नव्हते. पण या क्षेत्रात काम करतांना अनेकविध अनुभव आले आहेत. प्रत्येक टीका, प्रेम, ठेच, हे बऱ्याच गोष्टी शिकवितात. नेहेमी प्रवाहात राहिलो. त्याचा फायदा झाला आहे. चांगला चित्रपट प्रेक्षक पहातात, त्याचा मनापासुन आनंद घेतात. हेच आपले समाधान आहे. यातून नव निर्मितीची प्रेरणा मिळते. शिंदे यांच्या बरोबर काम करता आले याचे समाधान आहे. फुटाणे यांनी सांगितले की, कलाकार हा नेहेमी चांगल्या भूमिकेच्या शोधात असतो. तशी भूमिका मिळाली की आपोआप ती साकारली जाते. शिंदे यांनी तेच केले त्यामुळे ते एकाच भूमिकेत अडकले नाहीत.**
**नागराज मंजुळे, दिग्दर्शक.**

---

# चित्रा वाघ यांच्याकडून जगताप कुटुंबियांचे सांत्वन

## मान्यवरांची श्रद्धांजली : आमदार जगताप यांच्या आठवणींना उजाळा

पिंपरी : आमदार व माजी राज्यमंत्री सुरेश धस, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी खासदार नानासाहेब नवले, भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी शनिवारी पिंपरी-चिंचवडचे लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या पिंपळेगुरव येथील निवासस्थानी भेट देऊन श्रद्धांजली वाहिली. जगताप यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून सांत्वन केले.

लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप यांचे ३ जानेवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल राज्यभरातील सर्वपक्षीय राजकीय नेते, सामाजिक, धार्मिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून दुख व्यक्त होत आहे. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या निवासस्थानी येऊन त्यांना अभिवादन करत श्रद्धांजली वाहत आहेत.

शनिवारी आमदार व माजी राज्यमंत्री सुरेश धस, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी खासदार नानासाहेब नवले, भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पिंपळेगुरव येथील निवासस्थानी येऊन दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रतिमेला अभिवादन करत श्रद्धांजली वाहिली.



## संपादकीय »

# ऑक्टोपसचा विळखा

***भारतात ऑनलाइन गेमिंगवर कठोर नियंत्रण आणण्यात केंद्र सरकारने आधीच उशीर केला आहे. आता केंद्रीय माहिती तंत्रज्ञान खाते नवी स्वयंनियंत्रण व्यवस्था निर्माण करण्याचा विचार करीत आहे.***

मात्र, सध्याचा ऑनलाइन गेमिंगचा विस्तार आणि बहुपदरी धोका पाहता सरकारला आणखी अनेक खंबीर पावले टाकावी लागतील. २०१८ मध्ये दिल्लीत ऑनलाइन गेमिंगची टोळी पकडली, तेव्हा याचा व्याप किती असेल, याची कल्पना यंत्रणांना आली. दोन दिवसांपूर्वी प्रयागराज येथे एकाला अटक झाली. त्याच्या तपासावरून त्या ऑनलाइन गेमिंग सर्किटचे नियंते आखाती देशांमध्ये असल्याचे लक्षात आले. ऑनलाइन गेमिंगमध्ये लाखो लोकांकडून जमा होणारा अफाट पैसा असा देशाबाहेर तर जातो आहेच; पण त्याचे रूपांतर 'क्रिप्टो करन्सी'मध्येही होते. देशात अधिकृतपणेच ऑनलाइन गेमिंगची बाजारपेठ ४० हजार कोटींची आहे. मात्र, याच्या पलीकडे हे विश्व ऑक्टोपससारखे चहूदिशांना पसरले असून त्याच्या सोंडा अनेक देशांमध्ये आहेत. हा केवळ काळ्या पैशाचा, गुन्हेगारी अधोविश्वाचा, तरुणाईच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न नाही; तर देशाच्या संरक्षण आणि सुरक्षिततेशीही हा विषय अनेक अंगांनी भिडलेला आहे. केंद्र सरकारने नव्या नियमांबाबत नागरिकांच्या सूचना मागवताना या विषयाची खोली आणि गांभीर्य मनाशी बाळगले असेल, अशी अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने माहिती व तंत्रज्ञान या झपाट्याने विस्तारणाऱ्या विषयाबाबत अलीकडेच नवा कायदा केला. मात्र, तो कायदा अनेक प्रकारे ऑनलाइन गेम्स व गेमिंगला सर्व प्रकारे जोडून घेण्याची गरज आहे. ऑनलाइन गेमिंग हा शब्द तंत्रज्ञानाचा वर्ख घेऊन आला असला तरी त्यात जुगार व जुगारी मनोवृत्तीच अनुस्यूत आहे. त्यामुळे, १८६७ मध्ये ब्रिटिशांनी केलेला सार्वजनिक जुगाराच्या विरोधातील कायदाही त्याला लागायला हवा. अर्थात, हा इतका जुना कायदा व्यापकपणे राबवणे, सध्या शक्य नाही. या ऑनलाइन गेमिंगच्या धोक्याची पहिली घंटा काही वर्षांपूर्वी तमिळनाडूत वाजली. तेथे अचानक आत्महत्यांची वार्षिक सरासरी वाढली. खोलात गेल्यावर हे प्रमाण वाढण्यात ऑनलाइन गेमिंगचे यशापयश आणि नुकसान यांचा संबंध लक्षात आला. तमिळनाडूत या खेळांच्या आहारी गेलेल्या अवघ्या ११ वर्षांच्या मुलाने आत्मघात केला, तेव्हा तिथले समाजमन खडबडून जागे झाले. राज्य पातळीवर वेगळा कायदा झाला. आज भारतात अनेक राज्यांनी असे कायदे केले आहेत.




# डॉक्टर संप का करतात?



निवासी डॉक्टराना नेहमीच संपावर का जावे लागते, हा प्रश्न माझ्या मनाला कित्येक वर्षे पडतो आहे. अनेकदा ह्या प्रश्नासाठी मला मध्यस्थीही करावी लागली आहे. अगदी पुष्पाताई हिरे, दौलतराव आहेर डॉ. ललिता राव, दिग्विजय खानविलकर, सुरेश शेट्टी, डॉ. विजयकुमार गावीत, डॉविमलताई मुंदडा, दिलीप वळसे पाटील, मी स्वतः, गिरीश महाजन अशा अनेक मंत्र्यांना या विषयाला सामोरे जावे लागले आहे. पूर्वी महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य ही दोन्ही खाती एकत्रच होती पण गेल्या काही वर्षांमध्ये ही खाती वेगळी झाली आहेत. पण गेल्या अनेक वर्षांचा अनुभव पाहिला तर निवासी डॉक्टरांच्या मागण्या त्याच कायम आहेत. मला 'मार्ड'च्या अनेक अध्यक्ष तसेच सेक्रेटरी यांच्याशी संवाद साधण्यास मिळाला. सर्वसाधारणपणे या संघटनेचे अध्यक्ष आणि सचिव हे एमबीबीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या तिसरया वर्षाला असतात. त्यामुळे त्यांना पुढच्या फायनलच्या परीक्षेचीही तयारी करायची असते. डॉक्टरांना पुढचे स्वप्न खुणावत असते. त्यामुळे त्यांना युनियनबाजी करण्यात फार इंटरेस्ट नसतो. त्यामुळे खूपदा संप फार काळ ताणता येत नाही. दुसरे असे की रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना टाळता येत नाही. त्याचप्रमाणे, आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अचानक संपावर जाणाऱ्या या डॉक्टरांना प्रसिद्धी माध्यमांकडून कधीही सहानुभूती मिळत नाही. इतर संपकऱ्यांबाबत असे नसते. त्यांना पुष्कळदा मिडियाची किंवा समाजाची सहानुभूती असते. ती शक्यता डॉक्टरांच्या संपाबाबत कधीही नसते.

समाजाचा किंवा रुग्णांचा रोष ओढवू नये, यासाठी बऱ्याचदा संपावरील डॉक्टर समांतर ओपीडी चालवतात. त्यामुळे, ओपीडी पेशंटचे निदान हाल तरी टळतात. अर्थात, असे संप फार खेचता येत नाहीत. त्यामुळे पुष्कळदा संप मागे घेताना आणि मागण्या मान्य करून घेताना खूप काही सोडून द्यावे लागते आणि थोडेसेच पदरात पडते. पूर्वी इंटर्नशीपची रक्कम सुरूवातीला केवळ चारशे ते पाचशे रुपयेच होती. नंतर कित्येक वर्षे ती दीड ते दोन हजार रुपये इतकीच होती. कालांतराने ती रक्कम सहा हजार रुपये झाली. एखादा मुलगा किंवा मुलगी डॉक्टर झाल्यानंतरही खर्चासाठी आईवडिलांकडे पैसे मागणे, हे अपमानास्पद वाटते.या पार्श्वभूमीवर आत्ता डॉक्टरांचा संप मिटला आहे आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी संपकरी डॉक्टरांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यांना नवीन वसतिगृह बांधून द्यायचे सरकारने कबूल केले आहे. पण संपकरी आत्ता तातडीने नेमके काय मिळाले आहे, याचा विचार करायला हवा. वसतिगृहाची नवी इमारत होण्यासाठी तीन ते पाच वर्षे लागतील. त्यानंतर ओसी, फायर ऑडिट, लिफ्ट परमिशन ह्या सर्व एनओसी, ओसी नंतर गाद्या व फर्निचरसाठी टेंडर... या सर्व गोष्टींना अजून सहा महिने ते वर्ष लागेल. तोवर, एका खोलीत पाच ते सहा विद्यार्थी. ते कसा अभ्यास करणार? कधी २४ तर कधी ४८ तास सलग ड्युटी केल्यानंतर ते झोपणार कुठे? आताचा अनुभव म्हणजे बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालयाची दहा मजली इमारत कॉलेजच्या उद्घाटनानंतर सात वर्षांनी तरी मिळेल, असे वाटले होते. मात्र, जंग जंग पछाडले तरी अजून गाद्या व बिछाने नाहीत. त्यांची निविदा प्रक्रिया चालूच आहे. मेसही नाही. ज्यावेळी आपण मेडिकलच्या जागा वाढवतो, तेव्हा विद्यार्थी कुठे राहणार याचा विचार कोण करणार? महाराष्ट्रात डॉक्टर कमी आहेत, हे आपण नेहमीच ऐकतो. पण आहेत त्या डॉक्टरांना आपण किती सोयी देतो? ते कोणत्या वातावरणात काम करतात? त्यांचे विद्यावेतन नेमके किती असते? आरएमओ लेक्चरर झाल्यानंतर त्याला वेतन किती मिळते, या साऱ्यावर विचार करण्यासाठी राज्य शासन तसेच महापालिका प्रशासनांकडे वेळ आहे कुठे?संप झाल्यानंतर तात्पुरती मलमपट्टी केली जाते. कारण या मागण्यांसाठी 'मार्ड' सतत प्रयत्न करत असले तरी डॉक्टरांना परीक्षांचे टेन्शन, प्रॅक्टिकल्समध्ये काय होईल याची चिंता, अपुरे विद्यावेतन, पोस्ट ग्रॅज्युएशन करताना वरिष्ठांची मर्जी संभाळणे, अनुभव मिळण्यासाठी सतत काम करणे, ड्युटी करता करता अभ्यासही करणे, शहरी ग्रामीण भागांत स्थानिक विविध नेतेमंडळींच्या दबाव तंत्राला सामोरे जाणे..

# विश्वासाचे बियाणे रुजवूया..

**'शुद्ध बीजापोटी', ही वृत्तमालिका दैनिक 'लोकसत्ता'ने प्रकाशित करून बियाणांबाबत सविस्तर मांडणी केली आहे. त्या संदर्भात बियाणे उद्योगाच्या संघटनेची भूमिका 'अपप्रवृत्ती रोखा, पण, सर्वांना एकाच मापात मापू नका' अशी आहे.**

बियाणे ही अधिक उत्पादन व उत्पादकतेसाठीची मूलभूत निविष्ठा आहे. एकूण उत्पादन खर्चात बियाणे या घटकाचा वाटा अत्यल्प म्हणजे २ ते ५ टक्के असतो. परंतु पिकाच्या एकूण उत्पादनामध्ये शुद्ध बियाणे या घटकाचा वाटा १५ ते २० टक्के आहे व हा वाटा इतर निविष्ठांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने वापर करून ४५ टक्क्यांपर्यंत वाढविला जाऊ शकतो, असे शास्त्रीय अभ्यासातून दिसून आले आहे. अर्थातच यासाठी बियाणे शुद्ध व खात्रीचे असणे गरजेचे आहे. राज्यातील एकूण बियाणे पुरवठ्यात खासगी क्षेत्रातील कंपन्यांचा वाटा ६५ टक्क्यांपेक्षा जास्त असून, तो सतत वाढतोच आहे. ही बाब बियाणे उद्योगावरील शेतकऱ्यांचा विश्वास दर्शविते. मात्र, शेतकऱ्यांचे कोणत्याही कारणाने होणाऱ्या नुकसानीसाठी प्रथमत: बियाण्यांना व पर्यायाने बियाणे कंपन्यांना दोष दिला जातो ही बाब नाउमेद करणारी आहे. बियाणे उद्योग



हा असा एकमेव उद्योग आहे की ज्यामध्ये उत्पादक व ग्राहक या दोन्ही बाजूस शेतकरी आहे.

वास्तविक बियाणे उद्योग हा शासनाच्या विविध कायद्यांद्वारे नियंत्रित असणारा उद्योग आहे. शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे व गुणवत्तेचे बियाणे उपलब्ध व्हावे या उद्देशाने केंद्र, राज्य शासनाने विविध कायदे अमलात आणलेले आहेत. केंद्र सरकारचे बियाणे कायदा – १९६६, बियाणे नियम १९६८, बियाणे (नियंत्रण) आदेश – १९८३. राज्याचा महाराष्ट्र कापूस बियाणे कायदा – २००९ आणि जीवनावश्यक वस्तू कायदा – १९५५, पी. पी. व्ही. अँड एफ. आर. (प्रोटेक्शन ऑफ प्लँट व्हरायटीज अॅण्ड फार्मर्स राइट्स) अॅक्ट – २००१, वजने व मापे अधिनियम – १९७६ आणि याशिवाय आयात-निर्यात नियमन करण्यासाठी प्लँट क्वारंटाइन आदेश – २००३ व कापूस बियाणाच्या किमतीवर नियमन ठेवण्यासाठी कॉटन प्राइस (कंट्रोल) ऑर्डर – २०१५ निर्गमित केले आहेत, अशा एकूण आठ कायद्यांद्वारे बियाणे उद्योगाचे नियमन होते.

या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी तालुका स्तरापासून राज्य स्तरापर्यंत यंत्रणा आहे. कंपनीच्या गोडाऊनपासून ते किरकोळ विक्रेत्यापर्यंत विविध स्तरांवरून बियाणे नमुने काढून ते शासकीय प्रयोगशाळेत तपासले जातात. शासनाने उगवणशक्ती, आनुवंशिक शुद्धता व इतर बाबींचे मापदंड ठरविले आहेत, त्यानुसार बियाणे न आढळल्यास बियाणे विक्रेता/ उत्पादक कंपनीच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाते.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयमधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## मंत्रिमंडळ विस्तार : मंत्रिपदासाठी इच्छुक नाही, पण...

# विलंब होणं चांगलं नाही!

### » फडणवीस, शिंदे साहेबांना विनंती, लवकर विस्तार करावा: आ. संजय गायकवाड

। मुंबई। महाईन्यूज ।

सहा महिन्यानंतरही राज्यात अद्याप मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही, त्यामुळे विरोधक शिंदे-फडणवीस सरकारवर सातत्यानं टीका करत असतात. अता शिंदे-फडणवीस सरकारला घराचा आहोर मिळाला आहे. शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी मंत्रिमंडळ विस्तारावर रोखठोक भाष्य केलेय. ते म्हणाले की, आम्ही कुणीही मंत्रीपदासाठी इच्छुक नाही पण मंत्रिमंडळाच्या विस्तारासाठी इतका वेळ चांगला नाही. सहा महिने निघून गेले आहेत , अनेक लोक मंत्रीपदासाठी आस लावून बसलेले आहेत. आम्ही फडणवीस व शिंदे साहेबांना विनंती करतो की लवकर मंत्रिपदाचा विस्तार करावा.

हो बच्चू कडू यांचं बरोबर आहे , अनेक जण मंत्रीपदासाठी उत्सुक आहेत , मंत्रिपदाचा विस्तार झाल्यास राज्यातील कामे जलद गतीने होतील लवकर मंत्रिमंडळाच्या विस्तारासाठी आम्ही आग्रह करू, असे गायकवाड म्हणाले. संजय राऊत यांच स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही , हे दोन वर्षे काय 2024 नंतर 2029 पर्यंत आम्हीच सरकार मध्ये राहू आणि त्यानंतर ही आम्हीच राहू , एकनाथ शिंदे सुद्धा असतील, असा विश्वासही गायकवाड यांनी व्यक्त केलाय.



संजय राऊत यांनी देशभरात फिरून पाहावं की भाजपा हा एक मोठा समुद्र आहे आणि भाजपा शिवसेना अशी युती आहे , संजय राऊत यांनी तर शिवसेना डबक्यापेक्षा बेकार केलीये , भाजपा आणि आम्ही महासमुद्र आहोत हे सगळ्या देशाला माहीत आहे, असं प्रत्युत्तर त्यांनी संजय राऊतांना दिलेय..

शिंदे गटाचा डीएनए चेक करायला पाहिजे , संजय राऊतांच्या मागणीवर गायकवाड म्हणाले की, 'खरंय... आमचा डीएनए चेक केला तर नक्कीच बाळासाहेबांचे विचारच त्यातून बाहेर पडतील. मात्र यांचा डीएनए चेक केला तर काय बाहेर पडेल..? हे कोणत्या विचारांनी तिकडे गेले..? जे परिवर्तन व्हायचं होत तर सहा महिन्यापूर्वीच झाल आहे , आता खरं परिवर्तन त्यांचं होणं बाकी आहे की त्यांच्या डोक्यात बाळासाहेबांचे विचार जाणे आणि परिवर्तन होणे गरजेचे आहे.'

#### राज्यातील कामे जलद गतीने होतील

» अनेक जण मंत्रीपदासाठी उत्सुक आहेत , मंत्रिपदाचा विस्तार झाल्यास राज्यातील कामे जलद गतीने होतील लवकर मंत्रिमंडळाच्या विस्तारासाठी आम्ही आग्रह करू, असे गायकवाड म्हणाले. संजय राऊत यांच स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही , हे दोन वर्षे काय 2024 नंतर 2029 पर्यंत आम्हीच सरकार मध्ये राहू आणि त्यानंतर ही आम्हीच राहू , एकनाथ शिंदे सुद्धा असतील, असा विश्वासही गायकवाड यांनी व्यक्त केलाय. संजय राऊत यांनी देशभरात फिरून पाहावं की भाजपा हा एक मोठा समुद्र आहे आणि भाजपा शिवसेना अशी युती आहे , संजय राऊत यांनी तर शिवसेना डबक्यापेक्षा बेकार केलीये , भाजपा आणि आम्ही महासमुद्र आहोत हे सगळ्या देशाला माहीत आहे, असं प्रत्युत्तर त्यांनी संजय राऊतांना दिलेय. .

## राज्यावर संकट असताना छत्रपती शाहू महाराज वाड्यावर न राहता जनतेसोबत राहिले!

### » राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांकडून गौरवोद्गार

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात जेव्हा जेव्हा संकटे आली तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी वाड्यावर न राहता ते जनतसोबत राहिले. अनेक संस्था उत्तमरित्या चालवत आहेत, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी गौरवोद्गार काढले. शरद पवार यांच्या हस्ते करवीर अधीपती श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचा चांदीची गदा, शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

शरद पवार म्हणाले की, हा सोहळा आनंद देणारा आहे. अनेक राजवाडे होऊन गेले, पण त्यांची राज्ये त्यांच्या नावाने केली होती, पण एकच राज्य असं होतं जे कुटुंबाच्या नावाने नव्हते. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेलं राज्य रयतेचं राज्य होतं. ते हिंदवी स्वराज्य होतं. हा इतिहास छत्रपतींच्या घराण्यांनी जतन केला आहे.



समतेची विचारधारा कृतीमध्ये आणण्यासाठी राजा कोणता याची चर्चा देशात होते तेव्हा पहिल्यांदा नाव छत्रपती शाहू महाराजांचे येते. ही शाहू महाराजांची विचारधारा, परंपरा सातत्याने छत्रपतींनी जपली याचा आनंद आहे. छत्रपती असूनही त्यांचे लक्ष शेवटच्या माणसासाठी आहे. महाराष्ट्रात अनेक संकटे आली, महापूर आला, कोरोनाचे संकट आले तेव्हा छत्रपती वाड्यात राहिले नाहीत, ते सामान्य माणसांचे दुःख कमी करण्यासाठी रस्त्यावर आले.

पालकमंत्री दीपक केसरकर म्हणाले की, ज्या शाहू महाराजांनी खासबाग मैदानाची निर्मिती केली त्याच मैदानावर कार्यक्रम होणार हा आगळावेगळा योगायोग आहे. ऑलिम्पिकमध्ये पहिलं पदक कुस्तीमध्ये मिळवलं.कोल्हापूर जिल्ह्यात ज्या तालीम आहेत त्यांना मॅटिंग देणं ही वाढदिवसाची भेट ठरेल, असं मला वाटतं. त्यांचं दुसरं प्रेम आहे फुटबॉलवर. त्यामुळे येत्या वर्षभरात आम्ही फुटबॉलची मोठी स्पर्धा कोल्हापुरात घेऊ. पंचगंगेचं प्रदुषण 50 टक्क्यांपर्यंत याची खात्री देतो.

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री म्हणाले की, अनेकांचे वाढदिवस पाहिले, पण श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांचा वाढदिवस आज पर्यंत इतका भव्यदिव्य कोणी पाहिला नाही. आपण सगळेजण भाग्यवान आहोत की या प्रसंगामध्ये आपण सहभागी आहोत. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज जेव्हा जेव्हा कार्यक्रमाला येतात त्यावेळेला इतरांना जास्त बोलायला येतात अतिशय कमी वेळामध्ये मोजक बोलणं हा त्यांचा स्वभाव आहे. प्रचंड व्यासंग असणारे उच्चविद्याभूषित महाराज दहा दहा हजार पुस्तक जतन करणारे आणि त्या पुस्तकांच्या संग्रहातील अनेक पुस्तक वाचून इतरांची चर्चा करणारे आपले महाराज हे सर्वांशी बरोबरीने वागतात.

दरम्यान, यावेळी मनोगत व्यक्त करताना सतेज पाटील म्हणाले की, आदरणीय शाहू महाराज फुटबॉल असू दे कुठलाही खेळ असू दे सर्व धर्म समूहाच्या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये त्यांचे उपस्थिती आमच्यासाठी पर्वणी असते. हसन मुश्रीफ म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आज त्यांचा आपण सत्कार करत आहेत.

## “जादूटोणा करणे बंद करा, अन्यथा...”

### »राष्ट्रवादीचा शिंदे-फडणवीस सरकारवर हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर आमदार कामाख्या मंदीरात दर्शनास गेले होते याचा संदर्भ घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला अध्यक्ष विद्या चव्हाण यांनी शिंदे व फडणवीस यांचे नाव न घेता जादूटोणा बंद करण्याचे आवाहन केले आहे. महागाई आणि बेरोजगारी विरोधात एल्गार पुकारत आज राष्ट्रवादी काँग्रेसची जनजागर यात्रा नवी मुंबईत पोहोचली.

महिला प्रदेशाध्यक्ष विद्या चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली बेलापूर मधून या जनजागर यात्रेला मोठ्या जल्लोषात सुरुवात करण्यात आलीय. महागाई व बेरोजगारी विषयी हे सरकार एकही शब्द काढत नसून या विषयांवरून नागरिकांचे लक्ष विचलित करण्यासाठी धर्मवीर सारख्या विषयांवरून राजकारण केलं जातंय अशी टीका महिला प्रदेशाध्यक्ष विद्या चव्हाण यांनी केली. यावेळी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत निरिक्षक प्रशांत पाटील, तालुकाध्यक्ष सुधीर कोळी, आदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शोकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# राष्ट्रध्वजाची जागा भगवा झेंडा घेईल!

## पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा महबूबा मुफ्ती यांची भाजपवर टीका

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा प्रमुख महबूबा मुफ्ती यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना भाजपवर टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, “कोणताही देश कितीही शक्तीशाली झाला तरी तो आपल्याच लोकांविरोधात युद्ध जिंकू शकत नाही. भाजपाने आमचा झेंडा काढला आणि येणाऱ्या काळात ज्या राष्ट्रध्वजासाठी अनेकांनी



बलिदान दिलं, त्या राष्ट्रध्वजाची जागा भगवा झेंडा घेईल.”

या अगोदरही मुफ्ती यांनी वेळोवेळी भाजपावर टीका केली आहे. जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील अप्पर डांगरी येथे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या दहशतवादी हल्ल्यावरून त्यांनी, “काश्मीरसह भारत एक धर्मनिरपेक्ष ठिकाण आहे, मात्र ही गोष्ट वेगळी आहे की आता याला गोडसेचा देश बनवलं जात आहे. केंद्रशासित प्रदेशातील प्रत्येक नागरिकाची हत्या जम्मू-काश्मीरमध्ये राहणाऱ्या लोकांचे मोठे नुकसान आहे. अशाप्रकारच्या हल्ल्यांमुळे एक विशिष्ट राजकीय पक्षाला फायदा होत आहे.” असं म्हणत टीका केली होती.

राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसची ‘भारत जोडो यात्रा’ काही दिवसांमध्ये जम्मू-काश्मीरला पोहचणार आहे. या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसची तयारी सुरू झालेली आहे. काँग्रेसच्या काही वरिष्ठ नेत्यांनी उपराज्यपाल मनोज सिन्हा यांची भेट घेऊन, सुरक्षा व्यवस्थेवर चर्चा केली आहे.

### यात्रेत सहभागी होणार

»पराज्यपालांकडून यात्रेला सुरक्षा प्रदान करण्याबाबतचे आश्वासन देण्यात आले आहे. याशिवाय काश्मीरमध्ये या यात्रेत केंद्र सरकारच्या अन्य विरोधी पक्षांचे नेतेही सहभागी होणार आहेत. सर्वच विरोधी पक्षाच्या नेत्यांना त्याबाबत निमंत्रण देण्यात आले असुन, नॅशनल कॉन्फरन्सचे फारुख अब्दुल्ला, उमर अब्दुल्ला, पीडीपी प्रमुख महबूबा मुफ्ती, सीपीएम नेते एमवाय तारिगामीही यात्रेत सहभागी होणार आहेत.

» या अगोदरही मुफ्ती यांनी वेळोवेळी भाजपावर टीका केली आहे. जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील अप्पर डांगरी येथे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या दहशतवादी हल्ल्यावरून त्यांनी, “काश्मीरसह भारत एक धर्मनिरपेक्ष ठिकाण आहे, मात्र ही गोष्ट वेगळी आहे की आता याला गोडसेचा देश बनवलं जात आहे

# दिल्लीत महापौर, उपमहापौर पदाचा वाद वाढला

## LG कार्यालयासमोर 'आप' कार्यकर्त्यांचा घेराव; तर राजघाटावर भाजपचे आंदोलन

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक शुक्रवारी झाली नाही. प्रचंड गदारोळानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. आता आम आदमी पार्टी आणि भाजप रस्त्यावर उतरून एकमेकांचा निषेध करत आहेत. एलजी व्हीके सक्सेना यांच्या कार्यालयाबाहेर आपचे कार्यकर्ते निदर्शने करत आहेत.**




आप आमदार आतिशी यांनी भाजप आणि नायब राज्यपाल (एलजी) व्हीके सक्सेना यांनी नामनिर्देशित सदस्य मतदान करणार नसल्याचे लेखी निवेदन देण्याची मागणी केली आहे. त्याचवेळी राजघाटावर भाजप कार्यकर्ते आंदोलन करत आहेत. 'आप'च्या नगरसेवकांनी महिला पीठासीन अधिकाऱ्याला शिवीगाळ केल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्याच्यावर खुर्ची फेकली जाते.

अशा 'आप' नेत्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जावी, अशी मागणी भाजपने नायब राज्यपालांकडे केली आहे.

शुक्रवारी सकाळी 11 वाजता नगरसेवकांचा शपथविधी सुरू होणार होता, मात्र प्रोटेम स्पीकरने प्रथम नामनिर्देशित सदस्यांना शपथ देण्यास सुरुवात करताच आम आदमी पक्षाच्या (आप) सदस्यांनी विरोध करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भाजपच्या नगरसेवकांनीही त्यांच्याविरोधात घोषणाबाजी सुरू केली.

दोन्हीकडून धक्काबुक्की आणि हाणामारी झाली. आपचे नगरसेवक प्रोटेम स्पीकरच्या आसनावर चढले. यावेळी काही नगरसेवक खुर्ची उचलून शिवीगाळ करताना दिसले. धक्का लागल्याने काही खाली पडले. काहींना दुखापत झाली.

### वाद कोठून सुरु झाला

» महापौरपदाच्या निवडणुकीसाठी एलजीने भाजप नगरसेवक सत्या शर्मा यांची प्रोटेम स्पीकर म्हणून नियुक्ती केली. यापूर्वी 'आप'ने मुकेश गोयल यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता.

» 'आप'ने सत्या शर्मा यांच्या नावावर आक्षेप घेतला. यानंतर, प्रोटेम स्पीकर सत्या यांनी एलजीच्या नामनिर्देशित सदस्यांना शपथ देण्यास सुरुवात करताच 'आप'ने निषेध आणि घोषणाबाजी सुरू केली.

» आम आदमी पक्षाचे म्हणणे आहे की, नामनिर्देशित सदस्यांना आधी शपथ दिली जात नाही, पण भाजप ही परंपरा बदलत आहे. भाजप खासदार मीनाक्षी लेखी म्हणाल्या की, आप नेत्यांना नियमांची माहिती नाही. त्यामुळे ते गोंधळ घालत आहेत. बहुमत असताना भीती कशाला? तुम्ही खासदार राज्यसभेतही तेच करता.

» दुसरीकडे काँग्रेसने महापौरपदाच्या निवडणुकीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. आप आमदार आतिशी यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर काँग्रेस भाजपची बाजू घेत असल्याचा आरोप केला आहे. महापौरपदाच्या निवडणुकीत 273 सदस्य मतदान करणार आहेत. बहुमतासाठी 133 चा आकडा आवश्यक आहे. 'आप'कडे 150 तर भाजपकडे 113 मत आहेत.

» दिल्लीतील एमसीडीच्या महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती सदस्यांच्या निवडणुकीची प्रक्रिया गोंधळामुळे तीन तास उलटूनही सुरू झाली नाही. सकाळी 11 वाजता नगरसेवकांचा शपथविधी सुरू होणार होता. पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रथम नामनिर्देशित सदस्यांना शपथ देण्यास सुरुवात केली. यावेळी आम आदमी पक्षाच्या (आप) सदस्यांनी विरोध करण्यास सुरुवात केली. आपच्या निषेधाला भाजप नगरसेवकांनी विरोध केला.

# “प्रेमात सगळ्यात महत्त्वाची गोष्ट...” नातं टिकवण्यासाठी रितेश देशमुखचा मोलाचा सल्ला

सध्या रितेश देशमुख आणि जिनिलीया देशमुख यांची जोडी चांगलीच गाजतीये. नुकताच या दोघांचा ‘वेड’ हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला ज्याने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावलं आहे. रितेश देशमुखने या चित्रपटातून दिग्दर्शनात पदार्पण केलं आहे. शिवाय जिनिलीया देशमुखचा हा पहिलाच मराठी चित्रपट आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही तूफान कमाई करत आहे.

केवळ महाराष्ट्र आणि भारतच नव्हे तर परदेशातील लोकांनाही या चित्रपटाने अक्षरशः ‘वेड’ लावलं आहे. नुकतंच या दोघांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण करून २० वर्ष पूर्ण झाली. ‘तुझे मेरी कसम’ या चित्रपटातून दोघांनी या मनोरंजनविश्वात पदार्पण केलं होतं. या २० वर्षपूर्तीनिमित्तच्या



एका कार्यक्रमात दोघांनी चाहत्यांशी आणि पत्रकारांशी भरपूर गप्पा मारल्या. यादरम्यान रितेश आणि जिनिलीया या दोघांनी त्यांच्या नात्यामागचं सीक्रेट शेअर केलं. प्रेम आणि आदर यापैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट कोणती हे उलगडून सांगताना रितेश म्हणाला, “प्रेमात सर्वात महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती आहे रीस्पेक्ट म्हणजेच आदर, तुम्ही तुमच्या जोडीदारावर प्रेम करता पण तो तुम्हाला योग्य तो सन्मान देत नसेल तर ते फार चुकीच आहे. कमी प्रेम भरपूर आदर हे एकवेळ चालेल, पण भरपूर प्रेम आणि कमी आदर यामुळे कधीही कोणतंही नातं टिकू शकत नाही.”

चित्रपटगृहातही ‘वेड’ चांगलीच कामगिरी करणार असा सगळ्यांचा विश्वास होता आणि तो सार्थ ठरला आहे. या चित्रपटात रितेश-जिनिलियाबरोबरच अभिनेते अशोक सराफ, शुभंकर तावडे, जिया शंकर यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. याबरोबरच अभिनेता सलमान खान या चित्रपटात पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत झळकला आहे.





# करियर संपलं पण बिपाशा आजही कमवते करोडो रुपये

आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया.

बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे.

# बाल कलाकारांचीच हवा...

मालिकांमध्ये बहुतांश वेळा मुख्य स्थानी तरुण नायक-नायिका दिसून येतात. पण सध्या सुरू असलेल्या काही मालिकांमध्ये मध्यवर्ती भूमिकेत बालकलाकार झळकत आहेत. या मालिकांना विशेष पसंती मिळत असून त्यातील बालकलाकारांच्या कामाचं कौतुक केलं जातंय.

**रुहानिका धवन**

दैनंदिन मालिकांमध्ये मुख्य कथानक एरवी नायक-नायिका, कुटुंब यांच्याभोवती गुंफलेलं दिसतं. पण सध्याच्या काही मालिकांवर नजर फिरवली असता बालकलाकार मध्यवर्ती व्यक्तिरेखा साकारताना दिसताहेत. काही मालिका या छोटे कलाकार साकारत असलेल्या व्यक्तिरेखांभोवती फिरत आहेत.

तर काही मालिकांचे विषय वेगळे असले तरी सध्याचं कथानक लहान मुलांच्या व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून लिहीलं आहे. केवळ कथानकाला पूरक म्हणून काही प्रसंगांमध्ये दिसणारे बालकलाकार आता मध्यवर्ती व्यक्तिरेखा साकारू लागले आहेत. या मालिकांमध्ये मुख्य भूमिकेत असणाऱ्या बालकलाकारांना प्रेक्षकांची पसंती मिळतेय. मालिकांमध्ये काम केल्यानंतर आता या बालकलाकरांना नाव, पैसा फेम या तिनही गोष्टी मिळत आहेत. मालिकेमुळं प्रचंड लोकप्रिय झालेली एक बालकलाकार म्हणजे रुहानिका धवन. तिनं वयाच्या पंधराव्या वर्षीच कोट्यवधींचं घर खरेदी केलं. त्यामुळं ती सध्या चर्चेत आलीये.



रुहामिकानं 'ये है मोहब्बते' या हिंदी मालिकेमध्ये रुहीची भूमिका साकारली होती. रुहानिकानं तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर घर खरेदी केल्याचं चाहत्यांसोबत शेअर केलंय. तसंच एक खास सीक्रेटही सांगितलं. की, केवळ १५ व्या वर्षी तिनं घर कसं काय खरेदी केलं.रुहानिकानं इन्स्टाग्रावर नवीन घराचे सुंदर फोटो शेअर केले आहे. तिचं स्वप्नातं घर असं तिनं म्हटलंय. यावर तिच्या चाहत्यांनी लाइक्स कमेंट्सचा वर्षाव करत तिला शुभेच्छा दिल्यात. रुहानिकानं लिहिलं की, माझं स्वप्न सत्यात उतरलंय, याचा आनंद होतेय.हे घर घेणं माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे, असं तिनं म्हटलंय.

**आईमुळं शक्य झालं...**

रुहानिका हे घर घेणं केवळ आईमुळंच शक्य झाल्याचं म्हटलंय. तिच्या आईनं मिळालेलं मानधन खर्च न करता बचत करून ठेवलं होतं. ही तर केवळ सुरुवात आहे. आणखी मोठी स्वप्न पूर्ण व्हायची आहेत, असं तिनं म्हटलं होतं.

# अभिनेत्री क्रांती रेडकरच्या घरी चोरी

गेल्यावर्षी आर्यन खान ड्रग केस चांगलीच गाजली. या केसवर काम करणारे आणि याचा तपास करणारे अधिकारी समीर वानखेडे आणि त्यांची पत्नी मराठी अभिनेत्री क्रांती रेडकर या प्रकरणामुळे चांगलेच चर्चेत आले. नंतर या प्रकरणाने वेगळंच वळण घेतलं आणि क्रांती रेडकरच्या पतीवर बरेच आरोप करण्यात आले. आता पुन्हा क्रांती चर्चेत आहे. यावेळी कारण मात्र वेगळं आहे.



‘एबीपी न्यूज’च्या वृत्तानुसार नुकतंच मराठी अभिनेत्री क्रांती रेडकर हिच्या घरी चोरी झाल्याचं उघडकीस आलं आहे. क्रांतीच्या अत्यंत मौल्यवान अशा साडेचार लाखाच्या हातावर घातलं जाणारं घडयाळ चोरीला गेलं आहे. मुंबईच्या गोरगाव पोलिस स्थानकात नुकतंच याविषयी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# सुर्याच्या वादळापुढे लंका चारीमुंड्या चीत!

## » नवीन वर्षात टीम इंडियाने नोंदवला पहिला मालिका विजय

।पिंपरीः ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांच्या टी२० मालिकेतील अंतिम सामना शनिवारी, ७ जानेवारी रोजी राजकोटमध्ये खेळवला गेला. भारताने श्रीलंकेला धूळ चारत तब्बल ९१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. राजकोट येथील सामन्यात भारतीय संघाचा विस्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादव याने पुन्हा एकदा वादळी खेळी केली. त्याने यादरम्यान शतक झळकावत खास विक्रम आपल्या नावावर नोंदवला. त्याने युवराज सिंग आणि विराट कोहली यांच्यापेक्षा जास्त वेळा अशी कामगिरी करण्याचा मान मिळवला आहे. त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. तर अक्षर पटेलला मालिकावीराच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.



पहिल्या टी२० मध्ये टीम इंडियाने २ धावांनी विजय मिळवत १-० अशी आघाडी घेतली होती, तर पुण्यातील दुसऱ्या सामन्यात पाहुण्या संघाने पुनरागमन करत १६ धावांनी विजय मिळवून मालिकेत बरोबरी साधली होती. आता निर्णायक सामन्यात टीम इंडियाने शानदार कामगिरी करत नवीन वर्षातील पहिला मालिका विजय नोंदवला. टीम इंडियाने हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली सलग तिसरी मालिका जिंकली. त्याचबरोबर श्रीलंकेने सामना जिंकण्यासाठी खूप प्रयत्न केले मात्र ते अपयशी ठरले.

२२८ धावांचा डोंगर पार करताना श्रीलंकेची सुरुवात चांगली झाली होती. सलामीवीर मेंडीस आणि निसंका यांच्यात ४४ धावांची भागीदारी झाली. मात्र दोघे अनुक्रमे २३ आणि १५ धावा करून बाद झाले. या दोंघाच्या बाद होण्यानंतर श्रीलंकेच्या डावाला गळतीच लागली. अविष्का फर्नांडो १ धाव काढून बाद झाला. धनंजय डिसिल्वाने २२, चरिथ असालांकाने १९, दसुन शनाकाने २३ धावा करत संघर्ष करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले. हसरंगा ९ धावांवर , करूणरत्ने शून्यावर, महेश तीक्षणा २ धावांवर तर मदुशंकाने १ धाव काढून बाद झाला. भारताकडून अर्शदीप सिंग ने सर्वाधिक ३ गडी बाद केले. तर हार्दिक, उमरान आणि चहल ने प्रत्येकी २ गडी बाद करत विजयात आपले योगदान दिले. अक्षर पटेलला देखील एक गडी बाद करण्यात यश मिळाले.

सामन्यात नाणेफेक जिंकताच हार्दिकने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाने गेल्या सामन्यात पराभव स्वीकारल्यानंतर संघात एकही बदल केला नाही. पण श्रीलंकेने मात्र फलंदाजीत एक बदल केला. इशान किशन पहिल्याच षटकात बाद झाला. पण त्यानंतर राहुल त्रिपाठीने मात्र हार्दिकचा निर्णय योग्य ठरवला. नवख्या राहुल त्रिपाठीने १६ चेंडूत तुफानी ३५ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर सूर्यकुमार यादवने दमदार खेळीला सुरूवात केली. शुबमन गिलच्या साथीने त्याने अर्धशतकी भागीदारी केली. त्यानंतरही तो फटकेबाजी करतच राहिला. शुबमन गिल अर्धशतकाच्या जवळ पोहोचला पण त्याला ४४ धावांवर हसरंगाने माघारी धाडले.

श्रीलंकेच्या गोलंदाजांनी चाहत्यांना नाराज केले. मदुशंका आणि करूणरत्ने दोघांनी चार षटकाच ५० पेक्षा जास्त धावा दिल्या तर तीक्षणानेदेखील ४८ धावा खर्च केल्या. त्यानंतर कर्णधार हार्दिक पांड्या मोठा फटका मारताना ४ धावांवर बाद झाला. पाठोपाठ दिपक हुड्डादेखील ४ धावांवरच बाद झाला. हे दोघेही स्वस्तात बाद झाले पण सूर्यकुमारने मात्र फटकेबाजी बंद केली नाही.

---

# श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेपूर्वीच श्रेयस अय्यरला एक नव्हे तर मिळाले पाच पुरस्कार

## » 113* च्या सर्वोत्तम खेळीसह एक शतक आणि 14 अर्धशतके

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि श्रीलंका संघांत १० जानेवारीपासून वनडे मालिकेला सुरुवात होणार आहे. या मालिकेत तीन एकदिवसीय सामन्यांचा समावेश आहे. वनडे मालिकेसाठी भारतीय संघातील खेळाडूंनी तयारी सुरू केली आहे. या मालिकेतून संघातील स्टार खेळाडूही पुनरागमन करणार आहेत. अलीकडेच कर्णधार रोहित शर्मानेही त्याचा जिममध्ये वर्कआउट करताना व्हिडिओ शेअर केला आहे. दुसरीकडे, श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेत स्थान मिळवणाऱ्या श्रेयस अय्यरला या मालिकेपूर्वी पाच पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

भारतीय फलंदाज श्रेयस अय्यरला वार्षिक मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) पुरस्कार




कार्यक्रमात पाच पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. वांद्रे कुर्ला संकुलातील एमसीए क्लबमध्ये शुक्रवारी या पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. श्रेयस अय्यरसाठी २०२२ हे अतुलनीय वर्ष गेले. तो भारताच्या मधल्या फळीत, विशेषत: पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये महत्त्वाचा खेळाडू ठरला. मुंबई क्रिकेट असोसिएशनने शुक्रवारी रात्री आयोजित केलेल्या वार्षिक पुरस्कार सोहळ्यात (एमसीए वार्षिक पुरस्कार) त्याला ८ पुरस्कार मिळाले. त्याचबरोबर युवा खेळाडू पृथ्वी शॉला ९ पुरस्कार मिळाले. सरफराज आणि त्याच्या भावाने डझनाहून अधिक पुरस्कारांवर कब्जा केला. याशिवाय श्रेयस अय्यर आणि वेगवान गोलंदाज धवन कुलकर्णी यांच्याशिवाय भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांचाही सन्मान करण्यात आला.

विराट कोहली, रोहित शर्मा, केएल राहुल यांसारख्या स्टार फलंदाजांना आपल्या बॅटने मागे टाकत अय्यरने यंदा सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. टीम इंडियासाठी सर्वाधिक आंतरराष्ट्रीय धावा करणारा खेळाडू बनला. २०२२ मध्ये, अय्यरने ४८.७५ च्या सरासरीने १६०९ आंतरराष्ट्रीय धावा केल्या. त्याने ११३* च्या सर्वोत्तम खेळीसह एक शतक आणि १४ अर्धशतके झळकावली.

पाच कसोटींमध्ये, अय्यरने आठ डावांत चार अर्धशतकांसह ६०.२८ च्या सरासरीने ४२२ धावा केल्या. त्याने वर्षाचा शेवट ९२ च्या सर्वोत्तम कसोटी स्कोअरसह केला. १७ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ५५.६९ च्या सरासरीने ७२४ धावा केल्या. ५० षटकांच्या फॉर्मेटमध्ये त्याने १५ डावांमध्ये एक शतक आणि सहा अर्धशतके झळकावून, ११३* च्या सर्वोत्कृष्ट स्कोअरसह

# हकालपट्टी झालेले चेतन शर्मा पुन्हा झाले अध्यक्ष !

मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था

मागील जवळपास दीड महिन्यांपासून भारतीय क्रिकेट पुरुष क्रिकेट संघाच्या नव्या निवड समितीची सर्वांना प्रतीक्षा होती. मागील निवड समितीच्या बरखास्तीनंतर निवड समितीत कोण बसणार याविषयी उत्सुकता ताणली गेलेली. शनिवारी (७ जानेवारी) भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) नवीन निवडसमिती जाहीर केली. विशेष म्हणजे मागील बरखास्त केलेल्या निवड समितीचे अध्यक्ष असलेले चेतन शर्मा (CHETAN SHARMA) हेच नव्या निवड समितीचेही अध्यक्ष असणार आहेत. बीसीसीआयने ट्विट करत याबाबतची माहिती दिली.

टी२० विश्वचषक २०२२ च्या उपांत्य फेरीत भारताचा दारुण पराभव झाला. यानंतर बीसीसीआयने (बीसीसीआय) वरिष्ठ राष्ट्रीय निवड समिती बरखास्त केली होती. आता बीसीसीआयने नव्या निवड समितीची घोषणा केली आहे.

## यांना मिळाली निवड समितीमध्ये जागा

**» चेतन शर्मासह शिव सुंदर दास, सुब्रतो बॅनर्जी, सलील अंकोला आणि श्रीधरन शरथ यांना निवड समितीमध्ये स्थान मिळाले आहे. सुलक्षणा नाईक, अशोक मल्होत्रा आणि जतीन परांजपे यांचा समावेश असलेल्या क्रिकेट सल्लागार समितीने (CAC) अखिल भारतीय वरिष्ठ निवड समितीच्या सदस्यांची निवड केली. BCCI ने १८ नोव्हेंबर २०२२ रोजी निवडकर्ता पदासाठी अर्ज मागवले होते. यासाठी मंडळाकडे खूप अर्ज आले.**

**बीसीसीआयला निवडकर्ता पदासाठी ६०० हून अधिक लोकांकडून अर्ज आले होते. निवड समितीची निवड क्रिकेट सल्लागार समिती करते. चेतन शर्मा पुन्हा एकदा निवड समितीचे अध्यक्ष असतील, अशी माहिती बीसीसीआयने दिली.**